## निशाणी क्र. ९ कडील आदेश

प्रस्तूतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम २६ नियम ९ नुसार दावा मिळकतीवर प्रतिवादी यांनी केलेले अतिक्रमण मोजण्यासाठी न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करण्याकरीता दाखल केला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, प्रस्तूतचा दावा वादींनी प्रतिवादींद्वारे दावा मिळकत मौजे मजगाव, ता. मुरुड येथील गट नं. ७१९/३४७ क्षेत्र ०-००-८० हे.आर वर करण्यात आलेले अतिक्रमण दूर करुन मिळण्यासाठी दाखल केला आहे. त्यामुळे वादीने न्यायालयीन आयुक्त म्हणून उप अधिक्षक भुमि अभिलेख, मुरुड यांची नेमणूक होवून त्यांना नकाशासह अहवाल अभिलेखावर दाखल करणेबाबत निर्देश देण्याकरीता प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्याची मागणी केली आहे. प्रतिवादींनी निशाणी क्र. ३३ कडे आपले म्हणणे दाखल करुन दावा दाखल करण्यापूर्वी वादीने दिनांक १३/०६/२०१७ रोजी उप अधिक्षक भुमि अभिलेख मुरुड यांच्याकडून दावा मिळकतीची मोजणी करुन घेतली आहे. वादींनी त्यानुसार दाव्यामध्ये मोजणी नकाशा दाखल केला आहे. सदरचा दावा बांधकामासंबंधीचा असल्यामुळे ग्राम विकास अधिकारी किंवा वकीलांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्ती होणे आवश्यक आहे असा आक्षेप नोंदवला आहे. तसेच न्यायालय न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करण्याच्या मतास आल्यास वकीलांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

२. वादी तर्फे विद्वान वकील श्री. एम. जे. तांबडकर व प्रतिवादी तर्फे विद्वान वकील श्री. ए. व्ही. देशपांडे यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तूतचा दावा अतिक्रमण दुर करुन कब्जा परत मिळण्यासाठी दाखल करण्यात आला आहे. निशाणी क्र. ४ कडील कागदपत्राच्य यादीसह वादींनी न्यायालयीन आयुक्ताचा अहवाल सादर केला आहे. प्रतिवादींनी कैफियतीमध्ये सदर मोजणीबाबत आक्षेप नोंदवला आहे. त्यामुळे दाव्याचा निकाल गुण-अवगुणावर लागण्यासाठी दावा मिळकतीवर अतिक्रमण आहे का आणि असल्यास किती ही बाब अभिलेखावर येण्याकरीता उप अधिक्षक भुमि अभिलेख

यांच्याद्वारेच मोजणी होणे आवश्यक आहे. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करतो -

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. उप अधिक्षक भुमि अभिलेख, मुरुड यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात येते.

३. न्यायालयीन आयुक्त यांनी मौजे मजगाव, ता. मुरुड येथील गट क्र. ७१९/३४७ क्षेत्र ०-००-८० हे.आर या मिळकतीमध्ये किती अतिक्रमण आहे याबाबत नकाशासह सुस्पष्ट अहवाल सादर करावा असा निर्देश देण्यात येतो.

४. न्यायालयीन आयुक्त यांनी कमिशनचे काम करण्यापूर्वी वादी व प्रतिवादी यांना नोटीस द्यावी.

५. वादींनी दिनांक २२/०९/२०२२ तत्पूर्वी पर्यंत नियमानुसार कमिशन फी भरावी.

६. न्यायालयीन आयुक्त यांनी दिनांक ०६/१०/२०२२ पूर्वी पर्यंत आपला अहवाल न्यायालयात सादर करावा.

७. येणे प्रमाणे न्यायालयीन आयुक्तांना पत्र जारी करण्यात यावे.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

(सं. गं. सरोदे)

दिनांक : ०८/०९/२०२२ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरूड